1 4 MAY 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम निश्चित होणार

## बृहत् आराखड्याचे काम सुरु; पुढील आठवड्यात बैठका

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नवीन महाविद्यालये, विद्याशाखा आणि अभ्याक्रमांची निश्चिती होणार आहे. त्यासाठीच्या सन २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षांच्या कालावधीत स्वीकारावयाच्या प्रस्तावांचा शैक्षणिक बृहत् आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. त्याबाबत विद्यापीठाशी संबंधित घटकांची मते व माहिती घेण्यासाठी कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत २२ मेपासून बैठका घेण्यात येणार आहेत.

या आराखड्याद्वारे कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांत कोणत्या ठिकाणी नवीन महाविद्यालय, विद्याशाखा आणि अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे, हे निश्चित केले जाणार आहे. त्यादृष्टीने बैठकीस विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शैक्षणिक संस्था प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधींशी चर्चा करून त्यांची मते व माहिती घेऊन कार्यवाही होणार आहे.

तसेच ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रमाचे नियोजन स्थळ सुचवावयाचे आहे, त्यांनी विहित नमुन्यामध्ये माहिती भरून बैठकीच्यावेळी समन्वयक यांच्याकडे सादर करावी. यासाठी समिती नियुक्त केली आहे.

### समितीचे सदस्य

- **कोल्हापूर** : प्राचार्य जे. बी. पाटील (समन्वयक), प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे, डॉ. ए. एम. गुरव, पी. वाय. माने, डॉ. पी. एस. पाटील, शंकरराव कुलकर्णी, प्राचार्य डॉ. डी. व्ही. कडोले, प्राचार्य बी. ए. खोत.
- **सांगली** : प्राचार्य डॉ. बी. व्ही. ताम्हणकर (समन्वयक), प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. व्ही. पी. रासम, राजेंद्र आर. डांगे, डॉ. डी. के. मोरे, प्राचार्य डॉ. ए. मुल्ला.
- **सातारा** : डॉ. आर. व्ही. शेजवळ (समन्वयक), अमित चव्हाण, अमित कुलकर्णी, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, प्राचार्य सी. जे. खिलारे.



“कोल्हापूर, सांगली आणि सातारा या शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील नवीन महाविद्यालये, वाढीव तुकडी, अभ्यासक्रम याबाबतची माहिती घेतली जाणार आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल तयार करुन कुलगुरु यांच्याकडे सादर करण्यात येईल.

-डॉ. व्ही. डी. नांदवडेकर,
कुलसचिव शिवाजी विद्यापीठ.

### येथे होणार बैठक

- कोल्हापूर (कमला कॉलेज कोल्हापूर ) : २२ मे (सकाळी ११ वाजता)
- सांगली (विलिंग्डन कॉलेज) : २३ मे (सकाळी ११ वाजता)
- सातारा (लाल बहादूर शास्त्री कॉलेज) : २४ मे (सकाळी ११ वाजता)

**नमुना माहिती अर्ज....** विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) बीसीयूडी या लिंकवर उपलब्ध आहे.

14 MAY 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक बृहत् आराखड्याचे काम सुरु

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नवीन महाविद्यालये, विद्याशाखा आणि अभ्याक्रमांची निश्चिती होणार आहे. त्यासाठी सन २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षे कालावधीत स्वीकारावयाच्या प्रस्तावांचा शैक्षणिक बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. त्याबाबत विद्यापीठाशी संबंधित घटकांची मते व माहिती घेण्यासाठी कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत २२ मे पासून बैठका घेण्यात येणार आहेत, अशी माहिती एका पत्रकाव्दारे विद्यापीठ प्रशासनाने प्रसिद्ध केली आहे.

बृहत आराखड्याद्वारे कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांत कोणत्या ठिकाणी नवीन महाविद्यालय, विद्याशाखा आणि अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे, हे निश्चित केले जाणार आहे. त्यादृष्टीने या बैठकीस विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शैक्षणिक संस्था प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्रातील व समाजातील घटकांच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करून पुढील कार्यवाही होणार आहे. तसेच ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रमाचे नियोजन स्थळ सूचवावयाचे आहे. त्यांनी विहित नमुन्यामध्ये माहिती भरून बैठकीच्यावेळी समन्वयकांकडे सादर करावी. यासाठी समिती नियुक्त केली आहे.



### बैठकांचे ठिकाण

कोल्हापूर (कमला कॉलेज कोल्हापूर ) : २२ मे रोजी (सकाळी ११ वाजता). सांगली (विलिंग्डन कॉलेज) : २३ मे रोजी (सकाळी ११ वाजता) सातारा (लाला बहादूर शास्त्री कॉलेज) : ११ जुलै (सकाळी ११ वाजता)

### समितीचे सदस्य

**कोल्हापूर :** प्राचार्य जे. बी. पाटील(समन्वयक), प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे, डॉ. ए. एम. गुरव, पी. वाय. माने, डॉ. पी. एस. पाटील, शंकरराव कुलकर्णी, प्राचार्य डॉ. डी. व्ही. कडोले, प्राचार्य बी. ए. खोत. **सांगली :** प्राचार्य डॉ. बी. व्ही. ताम्हणकर(समन्वयक), प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. व्ही. पी. रासम, राजेंद्र आर. डांगे, डॉ. डी. के. मोरे, प्राचार्य डॉ. ए. मुल्ला. **सातारा :** डॉ. आर. व्ही. शेजवळ (समन्वयक), अमित चव्हाण, अमित कुलकर्णी, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, प्राचार्य सी. जे. खिलारे.

14 MAY 2017 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा निर्णय : बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.चा समावेश

# पदवी प्रथम वर्षासाठी 'सीबीसीएस' अभ्यासक्रम

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांचे आंतरविद्याशाखीय आणि इतर विद्याशाखांबाबतचे ज्ञान वाढावे, त्यांच्यामध्ये कौशल्यवृद्धी व्हावी या उद्देशाने पदवीच्या प्रथम वर्षासाठी शिवाजी विद्यापीठ हे 'चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम' (सीबीसीएस, निवडीवर आधारित श्रेणी पद्धत) अभ्यासक्रम लागू करणार आहे. बी. ए., बी. कॉम आणि बी. एस्सीकरिता यावर्षीपासून त्याची सुरुवात करण्याच्यादृष्टीने विद्यापीठाचे प्रयत्न सध्या सुरू आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) आणि राज्य शासनाच्या उच्चशिक्षण विभागाने राज्यातील विविध विद्यापीठांना 'सीबीसीएस' अभ्यासक्रम लागू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाने याबाबतची कार्यवाही वर्षभरापूर्वी सुरु केली. विद्यापीठाने गेल्यावर्षी हा अभ्यासक्रम लागू करण्याचे ठरविले होते. मात्र, अधिकार मंडळे अस्तित्वात नसल्याने याबाबतची कार्यवाही पुढे ढकलण्यात आली. राज्य शासनाने नवीन विद्यापीठ कायदा लागू केला असल्याने अधिकार मंडळे स्थापनेची कार्यवाही विद्यापीठ पातळीवर सध्या सुरु आहे. त्यामुळे 'सीबीसीएस'बाबतचा प्रलंबित प्रस्तावाला पूर्ण रुप देण्यासाठी विद्यापीठाची कार्यवाही सुरु आहे. याबाबत अभ्यास मंडळे विभाग 'सीबीसीएस'चा प्रस्ताव अधिकार मंडळांसमोर ठेवण्याची तयारी करत आहे. त्यांच्याकडून सकारात्मक निर्णय झाल्यास यावर्षीपासून हा अभ्यासक्रम पदवीच्या प्रथम वर्षासाठी लागू होणार आहे. दरवर्षी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातून बी. ए., बी.कॉम. आणि बी. एस्सीच्या प्रथम वर्षासाठी सुमारे ५५ हजार विद्यार्थी प्रवेशित होतात. त्यांच्यादृष्टीने 'सीबीसीएस'च्या अंमलबजावणीचे विद्यापीठाचे पाऊल महत्त्वपूर्ण आहे.

## 'सीबीसीएस'मध्ये होणार काय?

अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ विद्याशाखेसह इतर विद्याशाखेतील विषय घेता येणार आहेत. उदाहरणार्थ बी. ए. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याला संगीत व नाट्यशास्त्र अभ्यासक्रमातील विषय निवडता येईल. याबाबतच्या 'क्रेडिट'ची नोंद त्याच्या गुणपत्रिकेवर असणार आहे. 'सीबीसीएस'मध्ये गुणांऐवजी 'ए', 'बी', 'सी', 'डी' आणि 'ओ' अशा श्रेणी (ग्रेड) दिली जाईल. काही कारणास्तव एक सत्र झाल्यानंतर विद्यार्थ्याला दुसऱ्या विद्यापीठामध्ये प्रवेशित घ्यावा लागल्यास त्याने पहिल्या विद्यापीठात मिळविलेले क्रेडिट हे अन्य विद्यापीठात ग्राह्य धरले जाईल.

## रोजगारभिमुखता वाढीला बळ

'सीबीसीएस' अंतर्गत आंतरशाखीय आणि शाखेबाहेरील विषयांची आणि त्यांना त्यांच्या आवडीनुसार विषयांची निवड करता येते. विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजा अथवा त्यांच्या अंगी असलेल्या एखाद्या कलेनुसार विषय निवडता येतो. त्यातून ते अधिक रोजगारक्षम होण्यास मदत होणार आहे. विद्यापीठ पातळीवरील रोजगारभिमुखता वाढीला बळ मिळणार असल्याचे विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी सांगितले.

"

विद्यार्थ्यांमधील कौशल्य वाढीला बळ देणारा सीबीसीएस अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम पदवीच्या प्रथम वर्षासाठी लागू करण्याचा विद्यापीठाने निर्णय घेतला आहे. त्याची अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रशासकीय आणि परीक्षा विभागाच्या पातळीवरील काही अडचणी आणि विविध मुद्द्यांबाबत कार्यवाही सुरु आहे.

- डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी प्र-कुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ